सं. फौ. ख. क्र.४७६/२०१८ निशाणी ३४

**सरकार तर्फे साक्षीदार क्र.४ यांचा शपथेवर जबाब**
**मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,**

नाव – राजेंद्र विजयसिंग सोळंके

वय – ५५ वर्षे, व्यवसाय – वरीष्ठ गुप्त वार्ताहर अधिकारी, राज्य गुप्त वार्ता विभाग, परतवाडा उपकेंद्र

पत्ता – रा. आनंद नगर, अकोला, ता. जि. अकोला

**सरकारतर्फे सरकारी वकिल श्रीमती फौजिया त. अ. सादिक यांचे मार्फत सरतपास सुरुः**

१. मी बाळापूर पो.स्टे. येथे सन २०१७ मध्ये ए.एस.आय. म्हणून कार्यरत होतो. मी व्याळा बिट बाळापूर पो.स्टे. अंतर्गत कार्यरत असताना दि.०६.१२.२०१७ रोजी रात्री १०.३० ते १०.४५ वा. दरम्यान एक ट्रक क्र.एमएच३०/बी.डी/७७७ व एक बोलेरे क्र. एमएच२७/एक्स/७६०३ यामध्ये अपघात झाला होता. सदर अपघाताचा गुन्हा नोंद करण्यात आला होता, त्या गुन्ह्याचा तपास वरीष्ठांच्या आदेशाने माझ्याकडे वर्ग करण्यात आला होता. सदर गुन्ह्याकामी मला फिर्यादीचा जबानी रिपोर्ट व एफआयआर प्रत मिळाली होती. सदर कागदपत्रांचे मी अवलोकन केले व अपघातस्थळी दोन पंच व फिर्यादी यांच्या समवेत गेलो.

२. मी दोन पंचांसमक्ष घटनास्थळाचा दिसते परिस्थीतीचा पंचनामा केला. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला त्यावर दोन पंचासह माझी सही असून त्यातील संपुर्ण मजकूर माझ्या माहितीप्रमाणे खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.३५** देण्यात येत आहे. सदर अपघातातील अपघात करणारा ट्रक क्र.एमएच३०/बी.डी/७७७ हा दोन पंचांसमक्ष जप्त केला. आता मला सदर जप्ती पंचनामा दाखविण्यात आला, त्यावर माझी व दोन पंचांची सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.३६** देण्यात येत आहे.

३. सदर ट्रक चालक नामे सलीम खान हमीद खान यास सदर गुन्ह्याकामी अटक केली. आता मला आरोपीचा अटक पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी, पंचांची व आरोपीची सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.३७**

देण्यात येत आहे. सदर ट्रकचा क्लीनर नामे शे. साजीद शे. वजीर हा अपघातामध्ये गंभीर जखमी झाला होता त्यास वैद्यकीय उपचाराकरीता सर्वोपचार रुग्णालय अकोला येथे दाखल केले होते, त्यास डॉक्टरांनी मृत घोषीत केले. त्यामुळे सदर गुन्ह्यामध्ये भादंवि कलम ३०४–अ ची कलमवाढ केली व त्याबाबतचे पत्र संबंधित न्यायालयात दिले. आता मला सदर पत्र दाखविण्यात आले त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.३८** देण्यात येत आहे.

४. सदर अपघातामध्ये क्लीनर शे. साजीद शे. वजीर हा मयत झाल्याने सिटी कोतवाली, पो.स्टे. अकोला येथे त्याच्या मृत्युबाबत मर्ग दाखल करण्यात आली. सदर मयताचा मरणोत्तर पंचनामा संबंधित कोतवाली पो.स्टे. येथील कर्मचारी यांनी केला. सदर मयताचा संबंध सदर गुन्ह्याशी संबंधित असल्याने त्याचा मरणोत्तर पंचनामा, शवविच्छेदन अहवाल, मर्ग डायरी इ. कागदपत्र सदर गुन्ह्याकामी प्राप्त केले. सदर तपासामध्ये फिर्यादी व बोलेरोचा वाहनचालक व इतर साक्षीदार यांचे जबाब मी नोंद केले. सदर अपघातातील मयत याचा DAR फॉर्म मोटर अपघात प्राधिकरण येथे पत्राद्वारे पाठविला. आता मला दि.२९.१२.२०१७ रोजीचे संबंधित प्राधिकरण यांनी स्वीकारल्याचे पत्र दाखविण्यात आले. ते तेच असून त्यावर संबंधित मोटर अपघात प्राधिकरण यांची स्वीकारल्याबाबत सही आहे. त्यास **नि.क्र.३९** देण्यात येत आहे.

५. सदर अपघात करणारा ट्रकचे उप प्रादेशिक वाहन अधिकारी, अकोला यांच्याकडून तांत्रीक तपासणी करुन घेतली. आता मला नि.क्र.३१ कडील उप प्रादेशिक वाहन अधिकारी, अकोला यांचा तपासणी अहवाल दाखविण्यात आला. तो तोच आहे. सदर गुन्ह्यातील आरोपी व फिर्यादी यांचे अपघातातील गाडी मालकीबाबत तसेच वाहन चालक परवाना, ओळखपत्र व इतर कागदपत्र संबंधित तपासकामी प्राप्त केले. सदर अपघातातील ट्रक मालकाने सदरचा ट्रक हा सुपुर्तनाम्याद्वारे ताब्यात मिळण्याकरीता अर्ज केला होता. सदर अर्जाच्या अनुषंगाने मा. न्यायालयाने सदर ट्रकचा अंतरीम ताबा हा ट्रक मालकास बंधपत्रातील अटी व शर्तीनुसार देण्यात आला. आता मला सदर बंधपत्र दाखविण्यात आले. ते तेच असून त्यावर संबंधित ट्रक मालकाची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.४०** देण्यात येत आहे.

६.  सदर अपघातातील ट्रक चालक आरोपी याचे नाव चुकीने रिमांड अर्जामध्ये सलीम खान हमीद खान ऐवजी सलीम खान अमीन खान असे नमुद केले होते. सदर चुकीबाबत मा. न्यायालयात माझ्या सहीचे पत्र दिले, दुरुस्ती करण्याची विनंती केली. त्यानुसार रिमांड अर्जामध्ये त्याचे नाव सलीम खान हमीद खान असे दुरुस्त करण्यात आले. आता मला सदर पत्र दाखविण्यात आले त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.४१** देण्यात येत आहे. सदर गुन्ह्याच्या तपासामध्ये आरोपीविरुध्द सबळ पुरावा मिळून आल्याने न्यायालयात त्याच्या विरुध्द दोषारोप पत्र दाखल केले. मी आरोपीला पाहिल्यास ओळखू शकतो. आरोपी आज न्यायालयात उपस्थित नाही, त्याच्या ओळखीविषयी त्यांच्या वकीलांमार्फत कोणताही वाद उपस्थीत नसल्याचे सांगितले.

सरतपास पूर्ण.

**<u>आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. ए. जी. अवातिरक यांच्या मार्फत उलटतपासः</u>**

७.  मी घटनास्थळ व जप्ती पंचनामा करण्याकरीता संबंधित पंचांना लेखी नोटीस दिली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ व जप्ती पंच हे घटनास्थळावरुन काही अंतरावर काम करीत होते. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनास्थळ व जप्ती पंचनामा पो.स्टे. येथे तयार केला व पंचांच्या सह्या पो.स्टे. येथे घेतल्या.

| | |
|---|---|
| **प्रश्न :** | सदर घटनास्थळ हे येण्या जाणाऱ्या लोकांपासून सुरक्षित ठेवण्याबाबत तुम्ही कोणती कार्यवाही केली होती ? |
| **उत्तरः** | घटनास्थळ हे एकांतामध्ये व रस्त्याच्या कडेला १०० मी. आतमध्ये असल्यामुळे व अपघातग्रस्त दोन्ही वाहने रस्त्याच्या कडेला असल्यामुळे त्यांच्या सुरक्षतेबाबत मला कोणतीही तजविज करणे आवश्यक वाटले नाही. |
| **प्रश्न :** | पोलीस मॅन्युअल अन्वये घटनास्थळ हे तुम्हाला अनटच ठेवावे लागते, हे खरे आहे काय ? |
| **उत्तरः** | घटनास्थळाच्या परिस्थीतीनुसार आम्हाला त्याबाबत निर्णय घ्यावा लागतो. |
| **प्रश्न :** | सदर अपघातातील बोलेरे पिकअप याची तुम्ही संबंधित आरटीओ अधिकारी यांच्याकडून तपासणी करुन घेतली नाही हे खरे आहे काय ? |
| **उत्तरः** | सदर अपघातातील बोलेरो पिकअप ही रस्त्याने त्याच्या बाजूने जात होती, तसेच ट्रक चालक हा रस्त्याच्या विरुध्द दिशेने जात होता, त्यामुळे सदर अपघातामध्ये आरोपीच्या वाहनाची तपासणी केली. |

८. हे म्हणणे खरे आहे की, ज्या ठिकाणी अपघात झाला त्यावेळी राष्ट्रीय महामार्ग हा दुहेरी होता. सदर रस्त्याच्या मध्ये कोणताही विभाजक नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळी मी गेलो तेव्हा अपघातातील ट्रक व बोलेरो हे रस्त्याच्या कडेला पडलेले होते.

| | |
|---|---|
| **प्रश्न :** | तुम्ही घटनास्थळावर रस्त्यावर उमटलेल्या टायरच्या खुणा याची मोजमाप केले होते काय ? |
| **उत्तरः** | अपघातस्थळावर टायरच्या कोणत्याही खुणा मला दिसून आल्या नाही, त्यामुळे मी मोजमाप केले नाही. त्यामुळे मी घटनास्थळ पंचनामा मध्ये तसा उल्लेख केला आहे. |

९. अपघातसमयी कोणते वाहन कोठे होते, याचा शोध मी दिसत्या परिस्थीतीनुसार लावला. हे म्हणणे खरे आहे की, वाहनातील तांत्रीक दोष हे उप प्रादेशिक वाहन अधिकारी हेच सांगू शकतात. हे म्हणणे खरे आहे की, अपघातातील बोलेरो यामध्ये तांत्रीक दोष होता अथवा नाही, याबाबत मी तपास केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सदर तपासामध्ये फिर्यादीने सांगितलेल्या लोकांचेच जाब जबान नोंद केले, इतर व्यक्तींचे मी स्वतः जबाब नोंद केले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, सदर गुन्ह्यामध्ये सलीम खान हमीद खान यास जाणूनबुजून खोटेपणाने गोवलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर अपघातामध्ये आरोपीचा कोणताही दोष नसताना मी आरोपीविरुध्द चुकीचे दोषारोप पत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज न्यायालयात खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या सरतपासादरम्यान आरोपीविरुध्द कथन केलेल्या सर्व बाबी खोट्या सांगितलेल्या आहेत.

उलटतपास पूर्ण.
फेरतपास नाही.

**दिनांकः– ०५.०६.२०२६**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत**

DAYANAND MARUTI WAGHMARE

Digitally signed by DAYANAND MARUTI WAGHMARE
Date: 2026.06.05 17:07:12 +0530

**(डी. एम. वाघमारे)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**(न्यायालय क्र.२), बाळापूर.**

<u>प्रमाणपत्र</u>

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णय/आदेश/ पुरावा मधील शब्द नि शब्द हे मुळ न्यायनिर्णय/पुरावा/आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | :- | **श्री. डी. एम. वाघमारे,**<br>सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर. |
| लघुलेखकाचे नाव | :- | अजय एन. हांडे |
| घोषित दिनांक | :- | ०५/०६/२०२६ |
| न्यायनिर्णय/ आदेश/ पुराव्यावर पिठासीन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | :- | ०५/०६/२०२६ |
| अपलोड केल्याचा दिनांक | :- | ०५/०६/२०२६ |